# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org

roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१३/ ८३५

दिनांक :- 11 FEB 2013

प्रति,

प्राचार्य,

शासकीय व अनुदानित विनाअनुदानित

पदवी, पदव्युत्तर पदवी / अभियांत्रिकी महाविद्यालये/ औषधनिमार्णशास्त्र

शासकीय तंत्रनिकेतने व अनुदानित विनाअनुदानित तंत्रनिकेतने

औरंगाबाद विभाग.

विषय :- ''युवाजागर अभियान/युवक कल्याण कक्ष स्थापनेबाबत."

संदर्भ :- संचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१/डिटीई/२०१२/११
दिनांक.०४/०२/२०१३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक १ नुसार राज्य युवा धोरण २०१३ मधील शिफारशी नुसार युवक प्रशिक्षण केंद्र आपल्या संस्थेत स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित युवाजागर माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये युवक कल्याण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, पुणे यांच्या पत्राची प्रत तसेच मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण आणि उर्जा विभाग यांचे दिनांक २५ जानेवारी २०१३ च्या पत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

तरी आपण युवक कल्याण कक्षाच्या माध्यमातून हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी योग्य ते सहकार्य करावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत :- प्रोग्रामर यांना प्रत देऊन सुचित करण्यात येते की, सदरील पत्र हे या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

जाक्र / व्ही.आय.पी. / उच्च व तंत्र / २०१३/ ४९२६

मंत्री

महाराष्ट्र राज्य

**मंत्री**

**उच्च व तंत्र शिक्षण आणि ऊर्जा**

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*www.maharashtra.gov.in*

दिनांक

२५ जानेवारी २०१३

युकांच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र वेगवेगळ्या संस्थाच्या सहकार्याने युवाजागर अभियान राबवित आहे. राज्यातील महाविद्यालयामध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये देशाचे भवितव्य असलेली युवा पिढी, ज्ञानी,सुजाण,आत्मनिर्भर आणि निर्व्यसनी असणे अंत्यत गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांना स्थानिक व जागतिक पातळीवरील आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण मिळायला हवे. या उद्देशाने राज्यातील सर्व महाविद्यायांमध्ये सुसज्य असा युवक कल्याण कक्ष स्थापण्याची संकल्पना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रानी मांडलेली आहे. युवकांना शिक्षण प्रशिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध करून आपल्या कार्यकक्षेतील सर्व महाविद्यालयामध्ये सदर युवक कल्याण कक्ष स्थापन करण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

(राजेश टोपे)

**प्रति,**
**मा.संचालक,**
**तंत्रशिक्षण,मुंबई.**

२४/१/१३



D:\DELL-C\JALNA OFFICE\My Documents\MINISTER LETTER FROM 16 OCTOBER 2012.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.

**PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102**

**Telegram : Edutech E-Mail': director@dte.org.in Website: http://www.dte.org.in**


क्रमांकः १/डिटीई/२०१३/ ११

दिनांकः- 4 FEB 2013

प्रति,

१) सहसंचालक तंत्र शिक्षण,
सर्व विभागीय कार्यालये

विषयः- "युवाजागर अभियान/युवक कल्याण कक्ष स्थापनेबाबत"...
संदर्भः- जाक्र./व्ही.आय.पी/उच्च व तंत्र/२०१३/४९२६ दि.२५ जानेवारी २०१३

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग संदर्भ क्रमांक १ नुसार राज्य युवा धोरण २०१३ मधील शिफारशी नुसार युवक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित युवाजागर माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये युवक कल्याण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,पुणे यांच्या पत्राची प्रत तसेच मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण आणि उर्जा विभाग यांचे दिनांक २५ जानेवारी २०१३ च्या पत्राची प्रत सोबत पाठवित आहे.

तरी आपण युवक कल्याण कक्षाच्या माध्यमातून हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी योग्य ते सहकार्य करावे.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक, ...
नि. ...
आवक ... 1227
दिनांक 1 0 FEB 2013

Govt. Of Mha. Regd. No. MH-22640

# Maharashtara Information Technology Support Center

# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

प्रति,
मा. सह संचालक,
तंत्रशिक्षण, औरंगाबाद.

विषय : युवाजागर अभियान/युवक कल्याण कक्ष स्थापनेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, १२ डिसेंबर २०१२ रोजी १२ मिनिटे व १२ सेकंदानी युवाजागर अभियानाचा उद्घाटन सोहळा पी.डब्लु.डी ग्राऊंड ,सांगवी येथे पा पडला.पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्टीय सेवा योजना, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र सिझन ग्रुप सोशल वेलफेअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व सकाळ माध्यम समूहाच्या सहकार्याने आयोजित य सोहळयामध्ये पुणे व [redacted] चिंचवड शहरातील २३४ महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.युवकांच्या सर्वागिण विकासासाठी प्रायोगिक तत्वावर यशस्वी झालेले हे अभियान महाराष्ट्रातील प्रत्येक महाविद्यालयातील युवकांसाठी राबविण्याचा मानस आहे.

या अभियानाच्या माध्यमातून शासनाला स्वत: कोणताही खर्च न करता प्रत्येक महाविद्यालयामध्ये किमान ११ संगणकाचा समावेश असलेला 'युवक कल्याण कक्ष' ची स्थापना करता येईल. ज्याद्वारे युवकांन वेगवेगळया प्रकारचे किमान कौशल्यावर आधारित 93 संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रम शिकविण्यात येतील.त्याचबरोबर प्रत्येक महाविद्यालयाच्या परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक कंपन्याच्या गरजेनुसा आवश्यक ते [redacted] Skill मुलांना शिकवले जाईल व पदवी पूर्ण होताना त्यांना नोकरीची संधी उपलब्ध करू देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

आपल्या विभागाच्या माध्यमातून बाहेर पडणाऱ्या हजारो युवकांच्या स्वंयपुर्णतेसाठी राबविल्य जाणाऱ्या या अभियानाची माहिती राज्यातील प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी 'युवाजाग अभियानाची' राज्यव्यापी सुरूवात युवा दिनाचे औचित्य साधून दि.१२ जानेवारी रोजी केलेली आहे.राज्यभरातील सर्व विद्यापीठांना यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.तरी आपण आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये 'युवक कल्याण कक्ष' स्थापन करण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,

Jasswant

अध्यक्ष
युवाजागर अभियान

सोबत : युवाजागर अभियानाची कार्यपद्धती.

E-mail : uvajagar@gmail.com, Web : www.mitsc.co.in, Tel. No. :+9120 27281456.
Balasaheb Shitole Market, Sangavi, Pune - 411 027.

# युवाजागर अभियान

'युवा' या शब्दातच एक उत्साह खचाखच भरलेला जाणवतो. 'युवा' शब्द उलट वाचल्यानंतर तयार होतो तो 'वायू' म्हणजेच वायूच्या वेगाने मनात येईल ती प्रत्येक गोष्ट प्रत्यक्षात उतरवण्याची क्षमता. मन आणि मनगटाच्या जोरावर आव्हानांच्या क्षितीजावर संकल्प सिद्धीचा सुर्योदय घडविणारा युवा... चैतन्याचं प्रतिक, अफाट मानसिक व शारिरिक सामर्थ्य असणाऱ्या प्रवृत्तीचं नाव म्हणजे युवा. त्या प्रवृत्तीला वयाचा बंध नाही, प्रादेशिकतेच बंधन नाही, जातियतेच्या भिंती नाहीत, की नाहीत विषमतेच्या दऱ्या. एक दिलाने एकत्र येऊन अशक्य ते शक्य करण्याची ताकद युवकांनी आजपर्यंत बऱ्याच वेळेला दाखवून दिलेली आहे. पण असा हा युवक आज समाजामध्ये आहे कुठे? सामाजिक व्यवस्थेमध्ये त्याचं स्थान काय आणि सामाजिक जबाबदारीचं त्याला भान काय? यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. एकूणच देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती, प्रत्येक क्षेत्रातील तीव्र व गळेकापू स्पर्धा यामुळे युवकांचे असणारे सामाजिक बंध उसवताना आपल्याला दिसतात. त्यांना एका बाजूने पिढी वाया गेली, ते काहीच करू शकत नाहीत, पिढी व्यसनाधिन झाली अशी दुशने ऐकावी लागतात. वेगवेगळया पार्ट्यांच्या माध्यमातून, व्यसनांच्या माध्यमातून, साधनांच्या माध्यमातून स्वत:ला झिंगत ठेवणाऱ्या युवकांचे जथ्थे वाढायला लागले आहेत. लोकशिक्षणाची सामाजिक जबाबदारी असणारी इलेक्ट्रॉनिक माध्यमं, लोकशाहीचा चौथा स्तंभ असणारी प्रसारमाध्यमं यांच्यामध्ये कमालीची व्यावसायिक स्पर्धा वाढल्याने लोकांना जे रूचेल पचेल तेच प्रसारित करण्याच्या भूमिकेमूळे युवकांसमोर सातत्याने एक निराशेचे चित्र निर्माण होताना दिसते. वेगवेगळे घोटाळे, आरोप-प्रत्यारोप एकूणच व्यवस्थेकडून युवकाला मिळणारी वागणूक हे पाहता सामाजिक उपक्रमात सहभागी होण्यापेक्षा आपण आपल्या पुरताच विचार करणे योग्य असल्याचा विचार करणारा एक वर्ग निर्माण होत आहे. युवकांच्या मनामध्ये मुल्यशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रनिष्ठा,बंधूभाव,समानता या मुल्यांची जोपासना व्हावी म्हणून प्राथमिक शिक्षण व्यवस्थेमध्ये समाविष्ट केलेल्या मुल्यशिक्षणाचा भाग हा केवळ श्रेणी मिळविण्यापुरता मर्यादित झालेला आहे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्वातंत्र मिळविण्याच्या एकाच उदात्त हेतूने देशातील संपूर्ण युवापिढीला पछाडले होते. त्यामुळे उदरभरणा नंतरचा वेळ सामाजिक चळवळीशी जोडला जायचा. युवकांचं मन आणि मनगट दोन्हीही कार्यमग्न राहायचे. त्यामुळे विधायक सामाजिक स्थित्यंतरे घडल्याचे आपणास पहायला मिळते. पण जास्त आत्मकेंद्री झालेल्या परिक्षार्थी विद्यार्थ्याला ज्ञानार्थी बनवून जगण्यासाठी आवश्यक जबाबदारीची जाणीव करूण देणे गरजेचे आहे.

संपुर्ण जगाला हेवा वाटावा अश्या मुबलक प्रमाणत नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी साधन संपत्तीचा सुरेख संगम आपल्या देशामध्ये आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वकतृत्त्वाने जगाचे नेतृत्त्व करू शकतील असे वैचारीक व बौध्दिक सामर्थ्य आपल्या युवकांमध्ये आहे. अपप्रवृतीला भस्म करू शकेल असा विस्फोट प्रत्येक युवकामध्ये आहे. गरज आहे ती फक्त एका सृजनशील फुंकाराची, एका जागराची. हा जागर घडवणारा आहे 'युवाजागर अभियान'

- युवकांना युवकांच्या सामर्थ्याची जाणीव निर्माण करून देण्यासाठी युवकांनी चालवलेले असे हे 'युवाजागर अभियान'.
- युवकांच्या मनामध्ये सामाजिक जाण, जबाबदारी यांच भान निर्माण करून, युवकांच्या माध्यमातुन सक्रीय,सामाजिक स्थितंतराच स्वप्न पाहणारं अभियान म्हणजे 'युवाजागर अभियान'.
- लोकशाहीच्या रक्षणासाठी अस्तित्वात असणाऱ्या राजकीय व्यवस्थेचं विश्लेषण करून आपल्या अधिकार व कर्तव्याविषयी जागरूकता वाढवण्याचे अभियान म्हणजे 'युवाजागर अभियान'.
- माझा वेळ आई, वडील, मित्र मैत्रिणी, नातेवाईक याचबरोबर देशाचाही आहे अन् मी देशासाठी द्यायला तयार आहे असं माणनाऱ्या युवकांचा समुह म्हणजे 'युवाजागर अभियान'.
- स्त्री पुरूष समानतेच्या तत्त्वाने सामाजिक अपप्रवृत्तीवर घाव घालून विधायकतेचा डोंगर उभा करण्यासाठी एकत्र आलेला प्रवाह म्हणजे 'युवाजागर अभियान'.
- तंत्रशिक्षण आणि माहिती तंत्रज्ञानाबरोबरच सामाजिक मुल्यांची जोपासना करणारा असा हा एक 'युवाजागर अभियान'.

हा युवा जागर प्रत्येकाने घडवायचा आहे. आपण प्रत्येक जण दर आठवड्याला तीन तासाचा पिक्चर बघतो पण दर महिन्याच्या चौथ्या रविवारी युवकांच्या स्मृतीपटलावर विकसित भारताचा चित्रपट आणि त्या चित्रपटातील नायकाच्या भुमिकेमध्ये भारतीय सर्वसामान्य युवक हे आमचं आजच स्वप्न आपण उद्या सत्यात उतरावयाचं आहे...!

## सदर युवाजागर अभियानामार्फत युवकांना दिले जाणारे लाभ/शिक्षण, प्रशिक्षण, रोजगाराची संधी पुढीलप्रमाणे...

सहभागी प्रत्येक युवकाला (युवक/युवती) युवाजागर अभियानाचे सदस्य संबोधले जाईल. त्याच्या वयाची ३५ वर्षे पुर्ण होईपर्यंत तो युवाजागर अभियानाचा सदस्य राहील. तोपर्यंत त्याला अभियानाच्या प्रत्येक उपक्रमामध्ये सहभागी होता येईल/त्याला त्याचा लाभ मिळत राहील. ते पुढीलप्रमाणे...

(अ) 'युवाजागर अभियान' सदर उपक्रमाअंर्तगत वेगवेगळया प्रक्रिया उद्योग,सेवा उद्योग व व्यावसायिक आस्थापनांच्या माध्यमातून सदस्यांच्या वयाची ३५ वर्षे पुर्ण होईपर्यंत त्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाईल. इतकेच नाही तर संबंधित आस्थापनासाठी आवश्यक असणारे कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण युवकांना 'एम्प्लॉयबिलीटी स्किल' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिले जाईल व त्यानंतर त्याला आस्थापनांमध्ये पाठविण्यात येईल.

(ब) माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये जागतिकीकरणाच्या माध्यमातून लाखो रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत, यापुढेही होत राहतील. त्यासाठी आवश्यक असणारे अद्यावत तांत्रिक संगणक प्रशिक्षण अत्यंत महागडे झालेले आहे. त्यामुळे युवकांना सदर रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून १२ संगणक प्रमाणपत्र अभ्यासक्रम कोणतेही प्रशिक्षण शुल्क न आकारता नाममात्र परीक्षा शुल्कामध्ये शिकवले जाणार आहेत. कोर्सेसची यादी पुढीलप्रमाणे...

- CCIT
- TALLY
- DTP
- PERSONALITY DEVELOPMENT
- EVENT MANAGEMENT
- WEB DESIGNING
- 2D & 3D ANIMATION
- C,C++
- AUTOCAD
- JAVA
- AUDIO VIDEO EDITING
- VFX

क) जागतिकीकरणामध्ये युवकांना कौशल्यानुसार चांगल्या प्रमाणात आवक (उत्पन्न) सुरू होईल. पण त्यामुळे तो जर चंगळवादामध्ये गुरफटून व्यसनाधीन झाला तर भारत महासत्ता कदापी होऊ शकणार नाही. त्यामुळे सदस्यांना नैतिक अधिष्ठान प्राप्त व्हावे व राहणीमानाच्या दर्जामध्ये गुणात्मक वृद्धी व्हावी यासाठी व्यक्तीमत्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाईल.

(ड) 'स्टेटस सिम्बॉल' म्हणून विकएन्ड सेलिब्रेशनचे फॅड वाढत असताना अभियानातील सदस्यांना प्रत्येक महिन्यातील एका रविवारचे ४ तास यापद्धतीने एका वर्षात किमान २४ तास सक्रीय उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल. ज्याद्वारे त्यांची सामाजिक व राजकीय जाणिवांची जागृती केली जाईल. ज्यामुळे राष्ट्रनिष्ठा व सामाजिक जबाबदारी विषयी वैचारीक कक्षा रूंदावण्यास मदत होईल.

वरील अनेकविध मार्गांने युवकांना त्यांच्यामधील कर्तव्यांची जाणीव निर्माण करून देणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढवणे ,युवकांचे संघटन कौशल्य वाढवणे,राजकीय व सामाजिक अस्तित्व निर्माण व्हावे म्हणून प्रेरीत करणे इ. उद्देशाने कार्य केले जाईल.

## CPU Configuration

| No. | Details |
|---|---|
| 1 | Intel Core **i3** 2nd Gen |
| 2 | Asus Motherboard |
| 3 | 4 GB **DDR 3** RAM |
| 4 | 500 GB **HDD** Seagate |
| 5 | **DVD** Writer LG |
| 6 | **VIP** Cabinet |

- शैक्षणिक पात्रता किमान १२ वी
- कोर्सेस कालावधी ३ महिने प्रत्येकी
- वयोमर्यादा कमाल ३५ वर्षे
- सदर युवक कल्याण कक्षाच्या माध्यमातून वर्षभरामध्ये किमान ४ बॅचेस अपेक्षित विद्यार्थी संख्येसह व्यवस्थित चालवल्यानंतर सदर संगणक संचाची मालकी हक्क महाविद्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात येईल .

कळावे,

आपला विश्वासू,

Yasswant

U —
rn*

General Marathi from 17.12.12

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१**
**Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com**

-----------------------------------------------------------------------------------------------दूरध्वनी
क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र – शिससं/उशि/पुवि/मुंढे/२०१३/ २९५ दिनांक - १.२.२०१३

प्रति,

१. मा. संचालक, बी.सी.यु.डी.
पुणे विद्यापीठ, पुणे.

२. प्राचार्य, सर्व अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, विधी
व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.

३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

४. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

५. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.

६. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, पुणे.

**विषय-** **युवाजागर अभियान/युवक कल्याण कक्ष स्थापनेबाबत..**

संदर्भ- १. उच्च व तंत्र शिक्षण आणि ऊर्जा मंत्री यांनी दिलेले दिनांक २५ जानेवारी २०१३ चे पत्र.
२. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यत केंद्र यांचे दि. ३१.१.२०१३ चे पत्र.
P. मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांचे पत्र क्र. शिसं/उशि/२०१३/पी.ए. दि. २९.१.२०१३

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय संदर्भ क्र. १ नुसार व संदर्भ क्र. २ व ३ मध्ये निर्देशित केल्यानुसार राज्य युवा धोरण २०१३ तील शिफारशीनुसार युवक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित युवा जागर अभियानाच्या माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमध्ये युवक कल्याण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

राज्यातील महाविद्यालयांमधून व शैक्षणिक संस्थांमधून देशाचे भवितव्य असलेली युवा पिढी ज्ञानी, सुजाण, आत्मनिर्भर आणि निर्व्यसनी असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांना स्थानिक व जागतिक पातळीवरील आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण मिळायला हवे. यासाठी युवकांना शिक्षण-प्रशिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उददेशाने महाविद्यालयाने सदर युवक कल्याण कक्ष स्थापन करावेत.

तरी आपण युवक कल्याण कक्षाच्या माध्यमातून युवा जागर अभियान यशस्वीपणे राबवावेत व सदर अभियानाच्या प्रगतीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

(डॉ. एस.एस.शेटे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत - श्री. यशवंत शितोळे, अध्यक्ष, युवाजगार अभियान, बाळासाहेब शितोळे मार्केट, सांगवी पुणे - ४११ ०२७.